

# माणूस,

# मुलगा,

# आणि गाढव

लाफोंटेन

# माणूस,

# मुलगा,

# आणि गाढव

लाफोंटेन





एक दिवस पीठ गिरणीच्या मालकाने त्याचं गाढव

बाजारात विकून टाकायचं ठरवलं.





तो आणि त्याचा मुलगा गाढवाला

पकडायला मैदानात गेले.

गाढवाला गाजरं आवडायची म्हणून ते जाताना

काही गाजरं सोबत घेऊन गेले. ठरवल्याप्रमाणे

गाजरं बघताच गाढव लगेच जवळ आलं.





गाढवाने गाजरं खाल्ल्यावर ते त्याला घरी घेऊन आले. त्यांनी गाढवाला ब्रशने घासून अंघोळ घातली आणि त्याचे खुर पॉलीश केले. आता गाढव स्मार्ट दिसू लागलं. गाढवाचे पाय खराब होऊ नयेत म्हणून त्यांनी गाढवाला उचलून बाजारापर्यंत न्यायचं ठरवलं.

थोडं अंतर चालल्यावर त्यांना रस्त्यात एक शेतकरी भेटला.

शेतकरी त्यांना बघून हसायला लागला. “तुम्ही किती मूर्ख आहात”, शेतकरी म्हणाला. “तुम्ही गाढवाला उचलून नेत आहात. उलट तुम्हीच गाढवावर बसून जायला हवे.”





स्वतःवर कोणी हसलं तर त्या

माणसाला अजिबात आवडत नसे.



त्यांनी गाढवाला खाली उतरवलं.

आणि गाढव चालायला लागलं.



काही वेळाने त्याचा मुलगा चालून-चालून थकला. म्हणून

माणसाने त्याला गाढवाच्या पाठीवर बसवलं.



पुढे गेल्यावर त्यांना तीन व्यापारी भेटले. जेंव्हा त्यांनी मुलाला गाढवाच्या पाठीवर आणि माणसाला चालताना पाहिलं तेंव्हा ते रागावले.



“तू खूप आळशी आहेस,” ते म्हणाले. “गाढवावरून खाली उतर आणि तुझ्या म्हाताऱ्या वडिलांना गाढवाच्या पाठीवर बसू दे.”



मग त्याने मुलाला खाली उतरवलं आणि स्वतः गाढवाच्या पाठीवर बसला.

गरमी खूप जास्त असल्याने मुलगा लवकरच पुन्हा थकला.







थोडया वेळाने त्यांना तीन मुली भेटल्या. “तुम्हाला काहीही वाटत नाही का?”, मुली माणसावर भडकल्या. तुमचा मुलगा एवढा थकलेला असताना तुम्ही एकटेच गाढवाच्या पाठीवर कसे बसू शकता?”



मग माणसाने मुलालासुद्धा त्याच्या पाठी बसायला सांगितले.

काही अंतर गेल्यावर त्यांना चर्चच्या बाहेर एक पादरी दिसले. पादरीने माणसला रागाने फटकारले, “ या लहानश्या प्राण्यावर दोघांनी बसणं तुम्हाला शोभा देत नाही. तुम्हाला या प्रामाणिक प्राण्यावर थोडीही दया येत नाहीये का?”







त्यानंतर माणूस गाढवावरून खाली उतरला आणि मुलालाही उतरवले. आणि ते एवढया गरम उन्हात कसेबसे पुढे चालू लागले. आणि गाढवही त्यांच्या मागे चालू लागले.



शेवटी ते बाजारात पोचले. लोकांनी त्यांना तळपत्या उन्हात चालताना पाहिलं. खरतरं ते आरामात गाढवाच्या पाठीवर बसून येऊ शकले असते. “हा माणूस एकदम वेडा आहे”, व्यापारी म्हणाले.



लवकरच माणसाने गाढव एका दयाळू शेतकऱ्याला विकलं. पण इतक्या लोकांनी दिलेले सल्ले आणि उन्हातल्या प्रवासाने त्यांचं डोकं गरगरायला लागलं होतं.

“आतापासून मी स्वतः काय करायचं ते ठरवेन आणि स्वतःच्या निर्णयावर अटळ राहीन.” माणूस त्याच्या मुलाला म्हणाला. मुलाला वडिलांचा हा विचार आवडला त्याने मान हलवली. आणि ते दोघे जेवायला गेले.

**समाप्त**